# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल :- sceapune@gmail.com

रासनिप्रा/उमेदवार खर्च मर्यादा/ १५५० /सन २०२०.
दि. २० /०५/२०२०.

**वाचावे :-**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम कब ७३
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६५
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) (प्रथम सुधारणा) नियम, २०१८

**अधिसुचना**

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविण्यात आलेली आहे आणि,

ज्या अर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने सहकारी संस्थांच्या निवडणूका मोकळया, स्वतंत्र व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी उमेदवारांनी करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा महाराष्ट्र सहकारी संस्थां (समितीची निवडणूक) नियम २०१४ अन्वये विहित करणे आवश्यक आहे.

१. त्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६५ व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन सहकारी संस्थांच्या समितीची निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने निवडणूकी मध्ये करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादेबाबत प्राधिकरणाने यापुर्वी निर्गमित केलेली अधिसुचना जा.क्र.५८७/१४ दि.२९.१०.२०१४ अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारीत अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सहकारी संस्था कार्यक्षेत्र | उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा |
|---|---|---|
| १. | संपुर्ण राज्य | रु. ६.०० लाख |
| २. | महसुल विभाग | रु. ४.०० लाख |
| ३. | जिल्हा | रु. २.०० लाख |
| ४. | तालुका | रु. १.०० लाख |
| ५. | गाव | रु. ०.५० लाख |
| ६. | वॉर्ड | रु. ०.३० लाख |
| ७. | नगर पालिका / परिषदा | रु. ०.४० लाख |
| ८. | महानगर पालिका | रु. १.०० लाख |

२. याद्वारे असेही आदेशीत करण्यात येते की, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने निवडणूकीत झालेल्या खर्चाचा तपशिल सोबत जोडलेल्या प्रपत्र – 'अ' मधील नमुन्यात निवडणूक नियम ६७ नुसार ६० दिवसांच्या आत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

३. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या इसमाने निवडणूकीच्या खर्चाचा स्वतंत्र तपशील नामनिर्देशन पत्र सादर केलेच्या दिनांका पासून ते निकालाचे दिनांकापर्यंत दोन्ही दिवस धरुन विहीत मुदतीत देणे बंधनकारक राहील.

४. अ.क्र.१ मधील मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यास संस्थेचा निबंधक निवडणूक नियम ६६ अन्वये अनर्ह घोषित करील आणि अशी कोणतीही व्यक्ती निवडून येण्यासाठी अथवा कोणत्याही सहकारी संस्थेचा समिती सदस्य म्हणून असल्याचे चालू राहण्यासाठी त्या आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षे मुदतीपर्यंत अनर्ह ठरेल.

५. उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाच्या तपशिलाची पोहोच पावती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत:च्या सही शिक्क्या निशी उमेदवारास द्यावी.

६. निवडणूक खर्चाच्या संदर्भातील बाब निहाय खर्चाच्या पावत्या उमेदवाराने घेणे आवश्यक राहील.

७. प्रपत्र – 'अ' मधील खर्चाच्या तपशीला सोबत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने शपथपत्र सादर करावयाचे असून सदर शपथपत्रामध्ये त्याने केलेल्या सर्व खर्चाचा तपशिल प्रपत्र – 'अ' मध्ये समाविष्ट असुन "**प्रपत्र – 'अ' मधील नमुद केलेल्या खर्चा व्यतिरिक्त इतर कोणताही खर्च केलेला नाही**" असे नमूद करावयाचे आहे.

८. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने प्रपत्र – 'अ' मधील खर्चाची तपासणी व खात्री करुन, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास निवडणूक लढविणारे उमेदवाराने केलेला खर्च स्वीकारार्ह, अचूक आणि पुर्ण असलेचे कळविणे बंधनकारक राहील.

९. खर्चाचे संपुर्ण तपशील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तपासणी साठी मागितल्यास निवडणूक लढविणारे उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.

१०.निवॅडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने स्वतंत्र बँक खाते उघडून त्या खात्याद्वारेच निवडणूक खर्च करणे बंधनकारक राहील, तसेच त्या खात्याचा संपुर्ण तपशील देखील निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे मान्यतेनुसार.**

सोबत :- प्रपत्र – 'अ'

१५/०५/२०२०
(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणावे.

**प्रत सस्नेह रवाना** :-

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. आयुक्त (साखर), साखर संचालनालय, पुणे.
३. मा.आयुक्त (दुग्धविकास), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा.आयुक्त (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. मा.आयुक्त (मत्स्य), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. मा.आयुक्त (पशुसंवर्धन) महाराष्ट्र राज्य, पुणे.

## प्रपत्र – 'अ'

### निवडणुक विषयक खर्चाचे विवरण

| अ.क्र. | खर्चाची बाब | परिमाण / संख्या | खर्च करणा-या किंवा त्याला अधिकृत मंजुरी देणा-या व्यक्तीचे / संस्थेचे / संघाचे नांव | खर्चाची रक्कम | प्रदानाचा / प्रदानांचे दिनांक | प्रदानांची पध्दती | लेख्यासोबत जोडलेल्या प्रदानांचा पुरावा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्रावरील खर्च | | | | | | | |
| २ | प्रतिभूती ठेवीवरील खर्च | | | | | | | |
| ३ | मतदार याद्यांच्या प्रती खरेदी करण्यावरील खर्च | | | | | | | |
| ४ | प्रचार मोहिमांसाठी कार्यालयीन भाडयाने घेण्यावरील खर्च | | | | | | | |
| ५ | व्यक्तीगत माहिती पत्रकाच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ६ | भित्तीपत्रकाच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ७ | हस्तपत्रकाच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ८ | भित्ती पत्रके चिकटवण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| ९ | हस्तपत्रकांचे वितरण करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १० | जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| ११ | सार्वजनिक सभांचा प्रचार करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १२ | भिंतींवर लिखाण करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १३ | सार्वजनिक सभांसाठी मंडप वगैरे गोष्टी भाडयाने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १४ | सार्वजनिक सभांसाठी जागा भाडयाने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १५ | सार्वजनिक सभांसाठी ध्वनीक्षेपक भाडयाने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १६ | सार्वजनिक सभांमध्ये छायाचित्र काढण्यासाठी बोलाविलेल्या छायाचित्रकारांचा भाडेखर्च | | | | | | | |
| १७ | व्हिडीओ कॅसेट काढण्यासाठी व दाखविण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | ध्वनीमुद्रीत कॅसेट काढण्यासाठी व ऐकण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १९ | विशेष मान्यवर व्यक्तींच्या भेटी | | | | | | | |
| २० | दारे व कमानी उभारण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| २१ | उमेदवाराने वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २२ | निवडणुक प्रतिनधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २३ | मतदान प्रतिनधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २४ | मतमोजनी प्रतिनधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २५ | निवडणुक प्रतिनधींना दिलेले परिश्रमीक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २६ | मतदान प्रतिनधींना दिलेले परिश्रमीक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २७ | मतमोजणी प्रतिनधींना दिलेले परिश्रमीक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २८ | घरोघरी जाणा-या कर्मचा-यांना दिलेला परिश्रमीक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २९ | पॅनेलच्या मुख्यालयामध्ये जाण्यासाठी केलेल्या प्रवासावरील खर्च | | | | | | | |
| ३० | संकीर्ण खर्च (वर यादीमध्ये नमुद केलेल्या बाबींच्या व्यतिरीक्त ) | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

निवडणुक लढविणा-या उमेदवाराची स्वाक्षरी

**टिप :-** १.वर उल्लेखिलेल्या बाबी सर्व समाविष्ट नाहीत. त्यामुळे क्रमांक १ ते २९ बाबींव्यतिरीक्त करण्यात आलेला खर्च बाब क्र.३० या सर्वसाधारण खर्चाचे अंतर्गत तपशिलवार देण्यात यावा.

२.या प्रपत्रासोबत विहीत नमुन्यातील शपथपत्र जोडणे आवश्यक आहे. शपथपत्राशिवाय असलेले खर्चाचे विवरण पत्र, पूर्ण विवरणपत्र म्हणून स्विकरण्यात येणार नाही.

३.हिशेब निवडणुक प्रतिनिधीने दाखल केला असेल तर, त्यावर उमेदवाराने प्रतिस्वाक्षरी करावी व निवडणुक प्रतिनिधीने ठेवलेल्या हिशेबाची सत्यप्रत आहे असे प्रमाणित करावे.

४.टपालखर्च, रेल्वे प्रवास अशा प्रकारची प्रमाणके सादर करणे व्यवहार्य नाही. अशी प्रमाणके वगळता इतर सर्व खर्चाच्या बाबींची प्रमाणके सादर करणे आवश्यक आहे.